**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.७१/२०१७**

निशाणी क्र.५ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे.

**अर्जातील वादीची कथने थोडक्यात खालीलप्रमाणे :**

२. दावा मिळकत १अ, ब, क मध्ये वादीची कब्जेवहिवाट असून ती वादीने विकत घेतलेली आहे. प्रतिवादी वादीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज आहे.

**प्रतिवादी क्र.१ व २ यांचे अर्जाला म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे-**

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे न दिल्यामुळे त्यांच्याविरूध्द नि.१ वर दि.२४/११/०१७ रोजी कैफियत नाही असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

४. वादीतर्फे विधीज्ञ श्री सी. एल. भिसे यांचा युक्तीवाद ऐकून घेतला. प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे विधीज्ञ श्री डी. सी. पाटील युक्तीवाद करण्यासाठी उपस्थित राहीले नाहीत. त्यामुळे त्यांचा युक्तीवाद ऐकून घेता आला नाही.

५. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होत असून त्यांचे मी कारणांसहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | प्रथमदर्शनी केस वादीच्या बाजूने आहे का ? | होय. |
| २) | न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे का ? | होय. |

३) अर्ज नामंजूर केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होईल का ? होय.

४) काय आदेश ? अंतीम आदेशाप्रमाणे

## कारणमीमांसा

**वादीचा पुरावा-**

६. वादीने अर्जातील कथनांच्या पुष्टीकरता नि.३ सोबत विविध कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

**मुद्दा क्र.१ ते ४ करीता** -

७. सदरचे मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्यावरील चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्रीत विचारात घेण्यात आलेले आहेत.

८. वादी याचे नाव दावा मिळकतीच्या नि.१० येथील ७/१२ उता-यावर मालक व कब्जेदार सदरी दिसून येत आहे. वादीने नि.३/१ ते नि.३/३ येथे दावा मिळकतीची खरेदीपत्रे सादर केलेली आहेत. त्यामुळे वादीची दावा मिळकतीमध्ये मालकी हक्काची कब्जेवहिवाट असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादी यांना वादीच्या कब्जेवहिवाटीला योग्य कायदेशीर प्रक्रिया पार पाडल्याखेरीज हरकत अडथळा करता येणार नाही. त्यामुळे सकृतदर्शनी केस व न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. तुर्तातुर्त मनाईचा आदेश न केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ ते ३ यांना होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. ४ साठी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी, त्यांचे नोकर, चाकर अथवा त्यांच्यामार्फत हक्क सांगणा-या

इसमांना प्रस्तुत दाव्याच्या अंतीम निकालापर्यंत तुर्तातुर्त मनाई करण्यात येते की, त्यांनी वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीला कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करू नये.

३) या अर्जाचा खर्च मूळ दाव्याच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा.

ठिकाण – पाटण<br>
दिनांक – २९.११.२०१७

( म. पो. शिंदे )<br>
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, पाटण.